# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. १३

सभावृत्तांत

दिनांक ०५/०२/२०१६ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे फेब्रुवारी २०१६ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०५/०२/२०१६ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. अरुण मदन टाक | सभापती |
| २. | मा. श्रीमती उषा संजोग वाघेरे (पाटील) | सदस्या |
| ३. | मा. श्री. प्रमोद रघुनाथ ताम्हणकर | सदस्य |
| ४. | मा. श्रीमती विमल रमेश काळे | सदस्या |
| ५. | मा. श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर | सदस्या |
| ६. | मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्या |
| ७. | मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे | सदस्या |
| ८. | मा. श्री.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ९. | मा. श्री. रामदास गेणभाऊ बोकड | सदस्य |
| १०. | मा. श्रीमती वैशाली राहुल जवळकर | सदस्या |
| ११. | मा. राजेंद्र गणपत जगताप | सदस्य |

खालील प्रमाणे नामनिर्देशित सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री. शिवाजी तुकाराम पाडुळे

२. मा. श्री. सागर खंडू कोकणे

३. मा. श्री. धनंजय गणपत मोहिते

------------------

याशिवाय, मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रिय अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा. संदेश चव्हाण कार्यकारी अभियंता विद्युत ,मा. प्रदीप पुजारी, कार्यकारी अभियंता, झोनिपू, मा. नितीन देशमुख, उपअभियंता, विद्युत, मा. एल.बी. जाधव, मा. विनय ओहोळ, मा. एस. वाय. पाटील, उपअभियंता, स्थापत्य,मा. रवींद्र पवार, उपअभियंता, जलनि:सारण, मा. भाऊसाहेब साबळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. डॉ. सतीश गोरे, पशू वैद्यकीय अधिकारी,मा. सुरेश आव्हाळे, लेखाधिकारी, मा. विनोद बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा.एस.एस. गायकवाड,मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. निलेश दाते, मा. एस.पी. मोरमारे, मा. संकेत पावरा, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. रोकडे जयवंत, मा. वाकोडे ए.एम., मा. इदे ए.के. कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. व्हि. ए. पाडवी, कनिष्ठ अभियंता, विद्युत,मा. आनंद नायडू, कनिष्ठ अभियंता, झोनिपू /स्थापत्य, मा. व्ही.पी. सोनवणे, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. गोसावी, उद्यान निरीक्षक, मा. एस.के. माळी, मा. ए.सी. सोनवणे, एस.एच. चौहान, आर. एम. सौदाई, एस.ए. पाटील, आरोग्य निरीक्षक, मा. डोंगरे, समुह संघटक, नागरवस्ती विभाग, मा.डी.डी.सटाले,उद्यान सहाय्यक, इ. अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

ड प्रभाग समिती कार्यपत्रिका क्र. १३ वरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.

ठराव क्र.३२ विषय क्र. १

दिनांक ५/२/२०१६ विभाग : आरोग्य/स्थापत्य

प्रभाग क्र. ४४ मध्ये साई चौकात अस्तित्वात असलेली मुतारी ही अत्यंत जुनी झाली असुन त्यामुळे मोठया प्रमाणात दुर्गंधी व सामान्य नागरीकांच्या आरोग्याला अपाय निर्माण करणारी परिस्थिती निर्माण झाली आहे. याबाबत असंख्य नागरीकांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे सदर जुनी मुतारी पाडुन त्या ठिकाणी सुलभ मुतारी बांधणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------

सन्मा. सदस्य व मा. सभापती यांचे मान्यतेने बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेस मान्यता मिळावी.

**विषय क्र. १ :** स.नं. १ पिंपळे निलख गावठाण हद्दीतुन श्री. विष्णुपंत साठे यांच्या घरापासुन श्री. माऊली मुरकुटे यांच्या घराकडे जाणा-या रस्त्यास "**कै. चंपाबाई बबनराव इंगवले पथ**" व पिंपळे निलख मधील श्री. भास्कर कणसे यांच्या घरापासुन श्री. तुकाराम धरपळे यांच्या घराकडे जाणा-या रस्त्यास "**कै. कोंडाबाई गणपत धरपळे**" यांचे नाव देणेबाबत

**विषय क्र.** २ : काळेवाडी प्रभाग क्र. ४६ येथे आरक्षण क्र. ६४० मध्ये मनपा मार्फत शाळेचे बांधकाम चालू आहे. शाळेचे काम अंतिम टप्प्यात आले असुन सदर शाळेचे पिंपरी चिंचवड महानगरपालिका "**कै. दत्तोबा रामचंद्र काळे इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळा काळेवाडी**" असे नामकरण करणेबाबत

सन्मा. सदस्य व मा. सभापती यांचे मान्यतेने बैठकीमध्ये दाखल करुन घेणेत आलेल्या ऐनवेळच्या विषयांवर खालीलप्रमाणे मान्यता देणेत आली.

ठराव क्र.३३ विषय क्र. २

दिनांक ५/२/२०१६ विभाग: स्थापत्य

सुचक : सौ. आरती सुरेश चोंधे अनुमोदक : सौ. अनिता मच्छिंद्र तापकीर

संदर्भ : सन्मा. नगरसदस्या श्रीमती आरती सुरेश चोंधे यांचेकडील दिनांक ५/२/२०१६ रोजीचा प्रस्ताव

स.नं. १ पिंपळे निलख गावठाण हद्दीतुन श्री. विष्णुपंत साठे यांच्या घरापासुन श्री. माऊली मुरकुटे यांच्या घराकडे जाणा-या रस्त्यास "**कै. चंपाबाई बबनराव इंगवले पथ**" असे नाव देणे व पिंपळे निलख मधील श्री. भास्कर कणसे यांच्या घरापासुन श्री. तुकाराम धरपळे यांच्या घराकडे जाणा-या रस्त्यास "**कै. कोंडाबाई गणपत धरपळे**" यांचे नाव देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

---------------

ठराव क्र. ३४ विषय क. ४

दिनांक ५/२/२०१६ विभाग : स्थापत्य

सुचक : मा. प्रमोद रघुनाथ ताम्हणकर अनुमोदक : सौ. विमल रमेश काळे

संदर्भ : सन्मा. नगरसदस्य श्री. प्रमोद रघुनाथ ताम्हणकर यांचेकडील दिनांक ५/२/२०१६ रोजीचा प्रस्ताव

काळेवाडी प्रभाग क्र. ४६ येथे आरक्षण क्र. ६४० मध्ये मनपा मार्फत शाळेचे बांधकाम चालू आहे. शाळेचे काम अंतिम टप्प्यात आले असुन सदर शाळेचे पिंपरी चिंचवड महानगरपालिका "**कै. दत्तोबा रामचंद्र काळे इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळा काळेवाडी**" असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

-------------------

मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने सन्मा. सदस्यांनी सभेमध्ये खालीलप्रमाणे विविध विषयांवर त्यांचे मत व्यक्त केले.

**स्थापत्य विभाग** :-

**मा. रामदास बोकड** : - मा. ड प्रभाग समिती मध्ये नामकरणाबाबत ठराव करण्यात येतात त्या ठरावांवरील अंमलबजावणी वेळेत करण्यात येत नाही तसेच नामकरणाचे फलक अतिक्रमण विभाग वा रस्त्याच्या कामासाठी ज्या विभागाकडून काढून टाकण्यात येतात ते परत बसविण्यात येत नाहीत.

**कार्यकारी अभियंता स्थापत्य श्री. ओंभासे**: सदर बाब बीआरटीएस शाखेला कळविण्यात येईल व काढण्यात आलेले बोर्ड परत बसविण्यात येतील.

**मा. आरती चोंधे**: पिंपळे निलख येथील टॉयलेट ब्लॉकच्या ठरावावर अद्याप कार्यवाही प्रलंबित आहे.

**कार्यकारी अभियंता श्री. ओंभासे**:- सदर प्रकरणी मा. आयुक्त यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मान्यता प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मा. राजेंद्र जगताप** : नो पार्कीगचे बोर्ड, पी १,पी २ चे बोर्ड बसविण्याची कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे नागरीक नो पार्कींग परिसरात गाडया लावण्याचे प्रमाण जास्त आहे. तरी नो पार्कींग बोर्ड, पांढरे पट्टे इ. कामे तातडीने करण्यात यावी. डिव्हायडर बसविणेची कार्यवाही लवकरात लवकर करावी. सुशोभीकरणाचे काम पूर्ण करावे

**उपअभियंता श्री. पोरेडी** :- डिव्हायडरचे आदेश देणेत आलेले असुन सुशोभीकरणासाठी चौथरा बसविण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

**अतिक्रमण विभाग** :

कृष्णा चौक, काटे पुरम या परिसरातील अतिक्रमणांवरील कारवाई तीव्र करावी

१८ मीटरचे जेवढे रस्ते आहेत त्या सर्व ठिकाणी अतिक्रमणे होऊ नये यासाठी नो पार्कींग बोर्ड बसविण्यात यावेत,

**मा. काटे बापू उर्फ शत्रुघ्न सीताराम** :- अतिक्रमण विभागाकडून करण्यात येणारी कारवाई प्रभावी नाही.

**मा. राजेंद्र जगताप**:- अतिक्रमण विभागाकडून संध्याकाळी ६ पासुन ९ वाजेपर्यंत कारवाई करण्यात यावी. या कामी अतिक्रमण पथकास सहकार्य देणेत येईल.

**मा. शिवाजी पाडुळे** :- १८ मीटर रस्त्यांना लोखंडी बोर्ड लावण्यात यावेत तसेच एकाच ठिकाणी सलग पाच दिवस कारवाई करण्यात यावी.

**झोपडपट्टी निर्मुलन विभाग** :-

मा. अनिता मच्छिंद्र तापकीर :- झोपडपट्टीवासियांना जी जागा देणेत आली आहे त्यांनी सदर जागेच्या पुढे जाऊ नये यासाठी झोनिपू विभागाने कार्यवाही करावी

**आरोग्य विभाग** :-

**मा. अनिता मच्छिंद्र तापकीर** :- आरोग्य विभागाकडून मोकळया जागेत कचरा टाकू नये असा बोर्ड लावण्यात यावा.

**मा. रामदास बोकड** : कचरा गोळा करण्यासाठी जी एजन्सी नेमणेत आली आहे त्यांचे कामाचा दर्जा योग्य नाही. वेळेवर कचरा उचलला जात नाही. यास सभापती श्री. टाक व मा. श्रीमती अनिता तापकीर यांनी दुजोरा दिला.

**मा. शिवाजी तुकाराम पाडुळे** : पिंपळे गुरव येथील कचरा १२ दिवस उचलण्यात आला नव्हता.

**मा. क्षेत्रीय अधिकारी श्री. खोसे** :- कचरा वाहतुक विभागातील प्रामुख्याने ज्या तक्रारी होत्या त्यांचा निपटारा होत आलेला आहे. टाटा एसीई गाडयांचे मध्यंतरी टायर खराब होते . आता त्या सर्व गाडयांचे टायर्सचे काम पूर्ण करणेत येत असुन सद्यस्थितीत ४० गाडया कार्यरत आहेत. सर्व आरोग्य निरीक्षकांना सक्त सूचना देणेत आलेल्या आहेत.

**मा. राजेंद्र जगताप** : सर्व शाळांचे मुख्याध्यापक यांना पुढील बैठकीस बोलवण्यात यावे म्हणजे शाळांमधील आरोग्य विषयक अडचणी कळतील.

**पाणीपुरवठा विभाग**

**मा. वैशाली राहुल जवळकर** : वैदूवस्ती येथे पाण्याची कमतरता आहे. गेल्या सहा महिन्यापासुन तीव्रता जास्त आहे. त्यास मा. रामदास बोकड यांनी दुजोरा दिला व पुढील बैठकीस पाणीपुरवठा विभागाचे वरिष्ठ अधिकारी नसल्यास बैठक् तहकुब करण्यात येईल.

**विद्युत विभाग** :

**मा.** रामदास बोकड : रात्रीच्या वेळी विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास कर्मचारी उपलब्ध होत नाहीत.

**मा. क्षेत्रीय अधिकारी श्री. खोसे** :- विद्युत विभागाचे कर्मचा-यांचे कामकाजास अनुसरुन चर्चा झाली असुन मा. आयुक्त सो. यांनी या कामासाठी एक स्वतंत्र पथक नियुक्ती बाबत सूचना दिल्या आहेत असे सांगितले.

**मा. कार्यकारी अभियंता विद्युत** : ज्या कर्मचा-यांना ड प्रभाग परिसरातील भूमिगत केबलची तसेच वायरींग सर्कीटची माहिती आहे अशा कर्मचा-यांची सदर कामासाठी नेमणुक करावी लागणार आहे.

**मा. राजेंद्र जगताप** : सदर बाबत मा. आयुक्त सो. यांचेशी चर्चा करुन कार्यकारी अभियंता यांनी कार्यवाही पूर्ण करावी.

**मा. सभापती** :- सर्व उपस्थित अधिकारी यांनी सन्मा. नगरसदस्य यांनी दिलेल्या सूचनांनवर आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत सूचना देऊन सर्व सन्मा. नगरसदस्य व अधिकारी वर्ग यांचे आभार मानुन माहे फेब्रुवारी २०१६ ची बैठक संपलेचे जाहीर करतो.

सही/-
( अरुण मदन टाक )
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/१८१/२०१६
दिनांक – ०९ /०२/२०१६